बीड । शुक्रवार
२१.०३.२०२५
वर्षे : ४ अंक : ३४२
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# राज्यातील सरकारी शाळांना CBSE पॅटर्न लागू, शिक्षणमंत्र्यांचं सभागृहात लेखी उत्तर



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांना सीबीएसई (CBSE) अभ्यासक्रम लागू करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे यंदाच्या शैक्षणिक वर्षापासूनच स्टेट बोर्ड शाळेतील (School) विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात सीबीएससी पॅटर्न लागू करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ या वर्षापासून सीबीएससी पॅटर्न लागू होणार असून राज्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढील लागावी या हेतूने सरकारने हा निर्णय घेतला आहे. राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे (Dada bhuse) यांनी यासंदर्भात आज सभागृहात माहिती देत घोषणा केली. विशेष म्हणजे यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत झालेल्या बैठकीनंतरही त्यांनी राज्यात सीबीएससी पॅटर्न लागू करण्यासंदर्भात आढावा सुरू असल्याचे म्हटले होते.

राज्य अभ्यासक्रम आराखड्याला शालेय शिक्षण विभागाशी संदर्भात सुकाणू समितीने मान्यता दिली असून मंत्री दादा भुसे यांनी विधान परीषदेतील प्रश्नावर लेखी उत्तर देत माहिती दिली. भाजप नेते आणि आमदार प्रसाद लाड यांनी विचारलेल्या प्रश्नाला मंत्री दादा भुसे यांनी हे उत्तर दिले. राज्यातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या शाळांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या आराखड्याला सुकाणू समितीने मान्यता दिली का? असा प्रश्न आमदार प्रसाद लाड यांनी विचारला होता. त्यावर, सीबीएसई अंतर्गत पाठ्यपुस्तके मराठीत उपलब्ध करुन दिली जाणार असून १ एप्रिलपासून सत्राची सुरुवात करण्यात येणार असल्याचे उत्तर दादा भुसे यांनी दिले. त्यामुळे, गेल्या २ महिन्यांपासून सुरू असलेल्या .

### मुख्यमंत्र्यांनी बैठकीत केल्या होत्या सूचना

**राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मंत्रालयातील सर्वच विभागांसाठी पुढील १०० दिवसांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला होता. त्यानुसार शालेय शिक्षणामध्ये महाराष्ट्र पुन्हा आघाडीवर येणार असा विश्वास शालेय शिक्षण विभागाच्या बैठकीत त्यांनी व्यक्त केला होता. शिक्षण विभागाने गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पाऊले उचलावीत असे निर्देश यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले. दरम्यान, त्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत, त्यानुसार राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई (CBSE) पॅटर्नचा अंगीकार करून त्यात राज्याप्रमाणे आवश्यक बदल करण्यासंदर्भातही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचना केल्या होता.**

## युसुफवडगाव पोलीस ठाण्याच्या आवारात महिलेचा आत्मदहनाचा प्रयत्न

**अपहरण झालेल्या मुलीचा दीड महिन्यापासून तपास लागेना**

**केज । प्रतिनिधी**

इयत्ता १२ वीच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी महाविद्यालयात गेलेल्या एका अल्पवयीन मुलीचे तिच्या मामाच्या मुलाने लग्नाचे आमिष दाखवून अपहरण केल्याची दीड महिन्यांपूर्वी घडली होती. मुलीचा तपास लावण्यास पोलिसांकडून दिरंगाई होत असल्याने मुलीच्या आईने युसुफवडगाव (ता. केज) पोलीस ठाण्याच्या आवारात येऊन गुरुवारी ▶▶ उर्वरित पान २ वर

## सरपंच पतीचा पंचायत समितीत आत्मदहन करण्याचा प्रयत्न

**केज । प्रतिनिधी**

घनकचरा व्यवस्थापन, सांडपाण्याचे शोषखड्डे व सार्वजनिक शौचालय बांधकाम या कामांची मोजमाप पुस्तिकेत नोंद घेऊन बिल काढण्यासाठी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी महिला सरपंचाकडे ५० हजार रुपयेची मागणी केली. त्या पैकी त्यांना २० हजार रु. देऊनही ३० हजार रु. न दिल्यामुळे त्यांनी बिल काढले नसल्याने व्यथित होऊन संतप्त झालेल्या सरपंच पतीने केज पंचायत समितीमध्ये आत्मदहनाचा प्रयत्न केला.



केज तालुक्यातील डोका येथील महिला सरपंच कमल गोरख भांगे यांनी गावांमध्ये घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी नियोजन यासाठी आणि सार्वजनिक शौचालय याची कामे केलेली आहेत. सर्व कामे पूर्ण होऊन देखील त्याची मोजमाप ▶▶ उर्वरित पान २ वर

## खोक्या भोसले कोठडीत, पत्नीचे बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

**बीड । प्रतिनिधी**

पती, दीर, सासऱ्यावर दाखल केलेले खोटे गुन्हे तत्काळ मागे घेण्यात यावेत; आमचे घर पाडून आम्हाला रस्त्यावर आणणाऱ्या वनविभागाच्या अधिकाऱ्यावर कारवाई करा, या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर



सतीश ऊर्फ खोक्या भोसले याची पत्नी तेजू भोसले यांनी कुटुंबीयांसह बुधवारपासून उपोषण सुरू केले आहे. खोक्या सध्या पोलिस कोठडीत आहे. वेगवेगळ्या गुन्ह्यांत आरोपी असलेल्या खोक्याला पोलिसांनी उत्तर ▶▶ उर्वरित पान २ वर




## किरण बेदी व सायना नेहवाल यांच्या हस्ते ज्योतिदेवी रुपेशसिंह हजारी यांना मिळाला बेस्ट प्रिंसीपल अवार्ड

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

माजी आय ए एस अधिकारी किरण बेदी आणि बॅडमिंटन खेळाडू सानिया नेहवाल यांच्या हस्ते मुंबई येथील कार्यक्रमात धारूर च्या शारदा इंग्लिश स्कुलच्या प्रिन्सीपल ज्योती देवी रुपेशसिंह हजारी यांना बेस्ट प्रिन्सीपल वार्ड मिळाला त्यांचा सन्मान करण्यात आला या मुळे त्यांचे सर्वत्र कौतूक होत आहे. किल्ले धारूर शहरातील



शारदा इंग्लिश स्कूल येथे नऊ वर्षापासून प्रिन्सिपल या पदावर कार्य करत असणाऱ्या प्राचार्या ज्योतीदेवी रुपेशसिंह हजारी यांना शिक्षण क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल तसेच चांगले व्यवस्थापन करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास केल्याबद्दल इंडियन टॅलेंट ओलंपियाड या संस्थेच्या वतीने बेस्ट प्रिंसीपल हा अवार्ड ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीडमध्ये आणखी एक हत्याकांड, दोन भावांची निर्घृण हत्या; ६ जणांवर मकोका

**बीड । प्रतिनिधी**

बीडमध्ये गेल्या काही दिवसांपासून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला तीन महिने उलटले आहेत. या हत्या प्रकरणातील सर्व आरोपींवर मकोका लावण्यात आला आहे. तसेच बीडमधील खंडणी प्रकरणी अटकेत असलेल्या वाल्मिक कराडवर मकोका लावण्यात आला आहे. आता बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. संतोष देशमुख हत्या आणि खंडणी प्रकरणात वाल्मिक कराडच्या टोळीवर मकोका लावल्यानंतर आता आणखी एका सहा जणांच्या गुन्हेगारी टोळीवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या टोळीत तीन महिलांचाही समावेश आहे. दीपक ऊर्फ सलीम नारायण भोसले, सोमीनाथ ऊर्फ नाज्या दिलीप काळे, मुद्दसर मन्सुर पठाण, सोनी ऊर्फ अनिता गोरख भोसले, शशिकला दीपक भोसले आणि संध्या कोहीनुर भोसले, अशी मकोका लावण्यात आलेल्या आरोपींचे नावे आहेत. या सर्वांचा टोळीत समावेश आहे. या टोळीने बीड, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यात विविध गंभीर गुन्हे केले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, १६ जानेवारी रोजी वाहिरा ते पिंपळगाव रोडवरील गायरान ▶▶ उर्वरित पान २ वर




## जाहीर प्रगटन

चौसाळा गावातील सर्व जनतेस कळविण्यात येते की आपल्या घरासमोरील दुकानासमोरील रोडवरील शासकीय जागेत असलेले अतिक्रमण माननीय जिल्हाधिकारी साहेब बीड यांचे आदेशानुसार सर्व ठिकाणचे अतिक्रमण काढणे चालू आहे यासाठी आपणास जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की आपण दिनांक २२ मार्च २०२५ पर्यंत आपले अतिक्रमण स्वखर्चाने काढून घ्यावे नसता २२ तारखेपासून ग्रामपंचायत कार्यालय चौसाळा, महसूल चौसाळा, शासकीय जागेतील असलेले सर्व अतिक्रमण, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेतील सर्व अतिक्रमण मशीन लावून काढण्यात येईल व होणाऱ्या नुकसानीस सर्वस्वी आपण जबाबदार राहाल व याचा खर्च संबंधित अतिक्रमणधारकांकडून वसूल करण्यात येईल तरी सर्वांनी याची नोंद घेऊन आपले अतिक्रमण तात्काळ काढून घ्यावे असे आवाहन सरपंच मंगल प्रेमचंद लोढा उपसरपंच अंकुश पळसराम कळसे ग्राम विकास अधिकारी बाबासाहेब चव्हाण यांनी केले आहे.



# सुनीता विल्यम्स यांच्यासारखं नासामध्ये अंतराळशास्त्रज्ञ होण्यासाठी काय करावं लागतं ?



भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स १९ मार्चच्या पहाटे २८५ दिवस अंतराळात घालवल्यानंतर आपल्या सहकाऱ्यांसह पृथ्वीवर सुखरूप परतल्या आहेत. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर (आयएसएस) संशोधन करण्यासाठी २०२४ च्या जून महिन्यामध्ये त्या गेल्या होत्या, तेव्हापासून त्या तिथंच अडकल्या होत्या. ५ जून २०२४ रोजी अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांना बोईंगच्या नव्या स्टारलायनर अंतराळयानातून तिसऱ्यांदा अंतराळात पाठवण्यात आलेलं. अंतराळात असताना स्टारलायनरच्या पायलट म्हणून त्या काम करत होत्या.

आयएसएसमध्ये संशोधन करणं ही एक महत्त्वाची जबाबदारी आहे. त्यासाठी प्रशिक्षण आणि चांगला अनुभव आवश्यक आहे. १९९८ पासून नासामध्ये अंतराळ संशोधनावर काम करणाऱ्या सुनीता विल्यम्स या नासाच्या अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये सहभागी झाल्या आहेत. शिक्षण, प्रशिक्षण आणि कठोर मेहनतीच्या जोरावर त्या इथपर्यंत पोहोचू शकल्या. त्यांच्या या कामगिरीमुळे नासामध्ये अंतराळवीर म्हणून काम करण्यासाठी अनेक जण इच्छुक आहेत. मात्र, यासाठी काय तयारी करायची असते? कोणती पदवी नासामध्ये काम करण्याची संधी देऊ शकते? असा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण होत आहे.

सुनीता विल्यम्स यांच्याप्रमाणे अंतराळवीर होण्यासाठी आवश्यक पात्रता काय असतात?

नासा आपल्या विविध मानवी अंतराळ उपक्रमांसाठी काळजीपुर्वक अंतराळवीरांची निवड करतं.

नासामध्ये अंतराळवीर होण्यासाठी सशस्त्र दलाचे जवान आणि अधिकाऱ्यांव्यतिरिक्त सर्वसामान्य नागरिकही अर्ज करू शकतात.

नासामध्ये अंतराळवीर होण्याची पात्रता:

अर्जदार अमेरिकन नागरिक असणे आवश्यक आहे

मान्यताप्राप्त महाविद्यालयातून विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित क्षेत्रातील पदव्युत्तर पदवी असणं आवश्यक आहे. बायोलॉजिकल सायन्स, फिजिकल सायन्स आणि कॉम्प्युटर सायन्समधील पदव्युत्तर पदवीही वैध आहे. तसेच वैद्यकीय पदवीही वैध आहे. पदवीनंतर पुरेसा कामाचा अनुभवही असायला हवा. पदव्युत्तर पदवीनंतर जेट विमानाचा पायलट-इन-कमांड म्हणून किमान दोन वर्षांचा अनुभव किंवा एक हजार तासांचा अनुभव (विमान उडविणे) असावा.



नासाची दीर्घ कालावधीची अंतराळ उड्डाण शारीरिक चाचणीही पार पाडावी लागते. या चाचणीत दृष्टी तपासली जाते, रक्तदाब आणि उंची मोजली जाते. उंची ६२ ते ७५ इंच दरम्यान असावी.

सुनीता विल्यम्स यांना मिळालेल्या शिक्षणाबद्दल बोलायचं झालं तर त्यांनी यूएस नेव्हल ॲकॅडमीमधून फिजिकल सायन्समध्ये बॅचलर डिग्री घेतली आहे. फ्लोरिडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधून त्यांनी इंजिनीअरिंग मॅनेजमेंटमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतलंय. १९९८ मध्ये जेव्हा त्यांची नासामध्ये निवड झाली तेव्हा त्या अमेरिकन नौदलात कार्यरत होत्या.

त्यांनी अमेरिकन नौदलात अकरा वर्ष विविध पदांवर काम केलं. तसेच आतापर्यंत ३० प्रकारची विमानं त्यांनी उडवली आहेत.

नासामध्ये अंतराळवीर निवडीची प्रक्रिया कशी असते?

मानवी अंतराळ कार्यक्रमासाठी नासा अर्ज मागवतं, ज्यामध्ये अमेरिकन नागरिक आणि लष्कराच्या तिन्ही शाखांचे कर्मचारी अर्ज करू शकतात.

नासामध्ये अंतराळवीरांच्या निवडीची जबाबदारी 'स्ट्रोनॉट सिलेक्शन बोर्ड' या अंतराळवीर निवड मंडळाकडे असते.

येणाऱ्या सर्व अर्जांची पडताळणी या मंडळाकडून केली जाते. पडताळणी दरम्यान अर्जदाराची शैक्षणिक पात्रता व इतर माहितीची पडताळणी केली जाते.

सर्व अर्जांची पडताळणी केल्यानंतर हे निवड मंडळ काही लोकांना मुलाखतीच्या पहिल्या फेरीसाठी बोलावतं.

ही मुलाखत अमेरिकेतील ह्युस्टन येथील नासाच्या जॉन्सन स्पेस सेंटरमध्ये घेतली जाते.

ही मुलाखतीची प्रक्रिया आठवडाभर चालते. पहिल्या फेरीत यशस्वी झालेल्या उमेदवारांच्या पुन्हा मुलाखती घेतल्या जातात.

अंतिम मुलाखतीनंतर नासाच्या नव्या अंतराळवीरांची निवड केली जाते. त्यानंतर त्यांना प्रशिक्षणासाठी पाठवलं जातं.

जॉन्सन स्पेस सेंटरमध्ये हे प्रशिक्षण दिलं जातं आणि ते दोन वर्षांचं असतं.

नासामध्ये अंतराळवीरांना कसं प्रशिक्षण दिलं जातं?

निवड झालेल्या उमेदवारांना जॉन्सन सेंटरमध्ये मूलभूत अंतराळवीर प्रशिक्षण दिलं जातं.

ज्यामध्ये अंतराळात चालणं, अंतराळ स्थानक चालवणं, टी-३८ जेट विमान उडविणं आणि रोबोटिक हात चालविणं या गोष्टींचा समावेश असतो.

याशिवाय स्पेकवॉक, अंडरवॉटर लिव्हिंग, स्कूबा डायव्हिंग सह इतर अनेक कौशल्यं शिकवली जातात.

याशिवाय 'डायव्हिंग टेस्ट' अनिवार्य आहे. या चाचणीत, पोहताना २५ मीटर लांबीच्या जलतरण तलावात न थांबवता तीन फेऱ्या पुर्ण कराव्या लागतात.

त्यानंतर दुसरी जलतरण चाचणी घेण्यात येते, ज्यामध्ये २५ मीटर लांबीच्या तलावाच्या तीन फेऱ्या स्पेस फ्लाइट सूट आणि टेनिस शूज घालून कराव्या लागतात. यातही न थांबता तीन फेऱ्या पूर्ण कराव्या लागतात. वातावरणातील ताण सहन करण्याचं प्रशिक्षणही त्यांना दिलं जातं. याशिवाय मॉडिफाइड जेट एअरक्राफ्टमध्ये मायक्रोग्रॅव्हिटीचं प्रशिक्षणही दिलं जातं. हे दोन्ही प्रकारचं प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करावं लागतं.

अंतराळात गुरुत्वाकर्षण नसल्यानं हे प्रशिक्षण अत्यंत आवश्यक आहे. प्रशिक्षणाच्या दुसऱ्या टप्प्यात संगणकावर आधारित प्रशिक्षण दिलं जातं. यामध्ये नासाचे स्पेस शटल, प्रक्षेपण यान आणि अंतराळयान कसं चालवायचं हे शिकवलं जातं.

अंतराळयानाच्या यंत्रणेत बिघाड झाल्यास तो कसा ओळखायचा आणि त्याची दुरुस्ती कशी करायची याचंही प्रशिक्षणही दिलं जातं.

जॉन्सन सेंटरमध्ये प्रशिक्षणासाठी आयएसएसचं मॉडेल तयार करण्यात आलं आहे.

तिथं प्रशिक्षणार्थींना अंतराळातील जेवण तयार करणं, उपकरणांचा वापर व देखभाल, कॅमेऱ्यांचा वापर व विविध प्रकारची कामं याबाबत महत्त्वाची माहिती दिली जाते.

संपूर्ण प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थींचं मूल्यमापन केलं जातं.

जर एखाद्या व्यक्तीनं यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण केलं तर त्याची नासामध्ये अंतराळवीर म्हणून नियुक्ती केली जाते.

ज्यांना हे प्रशिक्षण पूर्ण करता येत नाही, त्यांना नासाच्या इतर विभागांमध्ये काम दिलं जातं.

भारत ही करतोय मानवी अंतराळ मोहिमेची तयारी

भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) देखील गगनयान मोहिमेवर काम करत आहे.

यामध्ये तीन अंतराळवीर तीन दिवस अंतराळात राहतील आणि त्यानंतर पृथ्वीवर परत येतील.

ही भारताची पहिली मानवी अंतराळ मोहीम असणार आहे. इस्रोनं या मोहिमेसाठी भारतीय हवाई दलाच्या चार वैमानिकांची निवड केली आहे.यामध्ये प्रशांत बाळकृष्ण नायर, अजित कृष्णन, अंगद प्रताप आणि शुभांशू शुक्ला यांची प्रदीर्घ निवड प्रक्रियेनंतर या मोहिमेसाठी निवड करण्यात आली आहे.

रशियात १३ महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर हे चारही अंतराळवीर इस्रोच्या अंतराळवीर प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेत आहेत.

इस्रोनं २०३५ पर्यंत अंतराळात स्वत:चं अंतराळ स्थानक उभारण्याची घोषणा केली आहे. जे भारतीय अंतराळ स्थानक म्हणून ओळखलं जाईल.



पान १/४ वरून पुढे...

## युसुफवडगाव पोलीस ठाण्याच्या...

दुपारी १ वाजेच्या सुमारास अंगावर पेट्रोल ओतून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी धरल्यामुळे अनर्थ टळला.अंबाजोगाई तालुक्यातील कुंबेफळ येथील योगेश्वरी व्यंकट माने या महिलेची मुलगी ऋतुजा व्यंकट माने ही आपेगाव येथील किसान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता १२ वीच्या वर्गात शिक्षण घेत होती. ५ फेब्रुवारी रोजी ऋतुजा माने ही आपल्या मामाच्या मुलीसोबत बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी आपेगाव येथील किसान विद्यालयात गेली होती. यावेळी तिच्या आत्याचा मुलगा गोपाळ हरीभाऊ काळे (रा. भावठाना ता. अंबाजोगाई) व त्याची आई मिरा हरीभाऊ काळे या दोघांनी मायलेकांनी तिच्यासोबत लग्न करण्याचे आमिष दाखवून फुस लावून ऋतुजा माने हिस पळवून नेले. त्यानंतर १५ फेब्रुवारी रोजी मुलीचे अपहरण करण्यात आल्याची तक्रार मुलीची आई ज्ञानेश्वरी माने यांनी दिल्यावरून गोपाळ काळे, मीरा काळे या दोघा मायलेकाविरुद्ध युसुफवडगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरून तिच्या आत्याचा मुलगा गोपाळ काळे आणि मिरा काळे या दोघा मायलेकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास फौजदार बसवेश्वर चेन्नशेट्टी हे करीत होते. या घटनेला दीड महिन्याचा कालावधी लोटला, तरी मुलीचा तपास लावण्यास पोलिसांकडून दिरंगाई होत असल्यावरून मुलीची आई योगेश्वरी माने या गुरुवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास युसुफवडगाव पोलीस ठाण्याच्या आवारात पेट्रोलचे कॅंड घेऊन आल्या. मुलीचा तपास का लावला जात नाही ? असे म्हणत त्यांनी अंगावर पेट्रोल ओतून घेत आत्महदहन करण्याचा प्रयत्न केला. या महिलेचा आरडाओरडा ऐकून जमा झालेल्या पोलिसांनी त्यांना धरून आत्मदहन करू दिले नाही. यावेळी फौजदार राहुल पतंगे, फौजदार बसवेश्वर चेन्नशेट्टी यांनी तिची समजूत काढली.

## सरपंच पतीचा....

पुस्तिकेत नोंद घेऊन त्यांच्या बिलासाठी त्यांनी वारंवार ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडे कागद पत्रांनिशी मागणी केली. परंतु ग्रामीण पाणीपुरवठा योजनेचे कार्यकारी अभियंता आंधळे, कनिष्ठ अभियंता चव्हाण आणि शाखा अभियंता वंदना साळवे या दोघांनी सरपंच पती गोरख भांगे यांच्याकडे ५० हजार रु. ची मागणी केली.

गोरख भांगे यांनी कार्यकारी अभियंता आंधळे यांना त्यापैकी २० हजार रुपये त्यांना नगदी दिले. मात्र अद्यापही त्यांचे विल निघाले नाही. त्या बाबत त्यांनी चौकशी केली असता उर्वरित ३० हजार रुपये जो पर्यंत देणार नाहीत; तोपर्यंत बिल मिळणार नाही. अशी अरेरावीची भाषा वापरली, तसेच खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी दिली.

त्यामुळे संतप्त झालेल्या सरपंच पती गोरख भांगे यांनी २० मार्च रोजी दुपारी ४:०० वाजण्याच्या सुमारास केज पंचायत समितीच्या इमारतीमध्ये आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. आत्मदहनाची माहिती मिळताच प्रभारी गटविकास अधिकारी समृद्धी दिवाने काळे यांनी केज पोलिसांना फोन करून त्यांना पाचारण केले. पोलीस उपनिरीक्षक शैलेश जोगदंड आणि त्यांचे पोलीस नाईक शिवाजी कागदे यांनी सरपंच पती गोरख भांगे यांना आत्मदहन करण्यापासून रोखले.

सरपंच पती गोरख भांगे हे त्यांच्या केलेल्या कामाच्या बिलापोटी प्रशासनाकडून होत असलेली अडवणुकीची माहिती प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधी देत असताना त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या गटविकास अधिकारी समृद्धी दिवाने - काळे यांनी पत्रकारांनी याचे व्हिडिओ किंवा फोटो घेऊ नयेत म्हणून त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला.

## खोक्या भोसले...

प्रदेशमधील प्रयागराजमधून अटक केली. सतीश भोसले सध्या पोलिस कोठडीमध्ये आहे. त्याच्यावर जंगली प्राण्यांची शिकार केल्याप्रकरणी प्रशासनाने आक्रमक भूमिका घेतली व त्याच्या घरावर बुलडोझर चालवण्यात आले. त्यामुळे त्याचे सर्व कुटुंब रस्त्यावर आले असून, न्यायासाठी त्याची पत्नी तेजू भोसले, बहीण आणि नातेवाइकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. काय आहेत मागण्या ?

- वनविभागाने ८ घरे उद्ध्वस्त केली. आम्हाला त्याच गावात शासनाने जागा उपलब्ध करून पक्के घर बांधून द्यावे. घर पाडणाऱ्या वन विभागाच्या अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करा.
- ढाकणे परिवाराला झालेल्या मारहाणीत सतीश भोसले, त्याचे तीन भाऊ व वडील यांचा काही संबंध नाही; तरीसुद्धा त्यांच्यावर गुन्हे दाखल केले. त्या दिवशी ते सर्वजण घरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दिसत होते. योग्य शहानिशा करून १६९ या कलमाअंतर्गत अहवाल देऊन त्यांना निर्दोष मुक्त करावे. फरार आरोपींना तत्काळ अटक करावी.
- माझा नवरा, आमचा परिवार व पारधी समाज यांच्याविरोधात अपप्रचार सुरू आहे. तो तत्काळ थांबवण्यात यावा.

## किरण बेदी व सायना...

देण्यात आला . संपूर्ण भारतातून शिक्षण क्षेत्रामध्ये चांगले कार्य करणाऱ्या प्राचार्यास हा अवॉर्ड देण्यात येतो , संपूर्ण भारतातून १४३ प्राचार्यांना हा अवॉर्ड देण्यात आला यामध्ये किल्ले धारूर शहरातील शारदा इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या ज्योतीदेवी रुपेशसिंह हजारी यांची निवड करून बेस्ट प्रिंसीपल अवॉर्ड देण्यात आला . यापूर्वीही त्यांना इंडियन सायन्स ओलंपियाड या संस्थेने सुद्धा विशेष पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले होते .हा अवार्ड भारतातील पहिली महिला आय ए एस अधिकारी किरण बेदी व प्रसिद्ध भारतीय बॅडमिंटन खेळाडू सायना नेहवाल यांच्या हस्ते देण्यात आला . त्यांनी शाळेमध्ये अनेक उपक्रम राबवून शाळेची एक वेगळी ओळख निर्माण केली यामध्ये 'एक मुठ्ठी अनाज ' हा उपक्रम राबवला आणि प्रत्येकाकडून एक मुठभर अन्न घेऊन ते गरजू लोकांना वितरित केले , तसेच व्हॅलेंटाईन डे या दिवशी त्यांनी मातृ-पितृ दिवस म्हणजे आई वडिलांविषयीचे प्रेम या विद्यार्थ्यांमध्ये जागृत केले . त्याचबरोबर ग्रँड पॅरेन्ट डे साजरा करून आजी- आजोबा हे पण किती महत्वाचे आहेत याची जाणीव मुलांना करून दिली .अशा आणि इतर अनेक वेगवेगळे उपक्रम घेतल्याबद्दल त्यांना बेस्ट प्रिंसीपल अवार्ड देण्यात येऊन त्यांचा सन्मान मुंबई येथील एका मोठ्या समारंभात करण्यात आला .हा सन्मान मिळाल्याबद्दल श्री छत्रपती शिक्षण संस्थेचे सचिव रमेशराव आडसकर व संस्थेच्या संचालिका अर्चनाताई आडसकर यांनीही त्यांच्या बद्दल गौरवोद्गार काढून त्यांचे कौतुक केले .

बेस्ट प्रिंसीपल अवॉर्ड मिळाल्याबद्दल हजारी परिवारातून तसेच किल्ले धारूर शहर व परिसरातून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे

## बीडमध्ये आणखी....

जमिनीत या आरोपींनी आजिनाथ विलास भोसले आणि भरत विलास भोसले या दोघांची निर्घृण हत्या केली होती. या प्रकरणी अंभोरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आता याप्रकरणी सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे, तर अजून तीन जण फरार आहेत. गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यास मदत होणार- या टोळीवर खून, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, अवैध शस्त्र बाळगणे, पुरावे नष्ट करणे, रस्ता अडवणे अशा स्वरूपाचे १३ गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे या टोळीवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याचा निर्णय पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी घेतला. सहाय्यक पोलिस निरीक्षक मंगेश साळवे यांनी प्रस्ताव तयार करून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवला. विशेष पोलिस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांनी या प्रस्तावास मंजुरी दिली. या कारवाईमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यास मदत होणार असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## जिल्हाधिकारी साहेबांच्या...

त्यांच्या बांधकाम नुकसानभरपाई सर्वस्वी जबाबदारी अतिक्रमण धारकावर राहील करिता सर्व नागरिकांनी आपले अतिक्रमण एक दिवसात हटवून सहकार्य करावे असे आवाहन चौसाळ्याचे सरपंच सौ मंगल ताई लोढा उपसरपंच अंकुशराव कळासे ग्रामविकास अधिकारी बाबासाहेब चव्हाण मंडलअधिकारी जायभाये साहेब तलाठी के आर निर्मळ यांनी केले आहे.

## आज सोन्नाखोटा...

ह.भ.प कृष्णा महाराज खोटे, बुधवार दि. २६ मार्च २०२५ ह.भ.प अर्जुन महाराज लाड (गुरुजी), गुरुवार दि. २७ मार्च २०२५ ह.भ.प श्रीराम महाराज विडेकर, शुक्रवार दि. २८ मार्च २०२५ ज्ञानेश्वर माऊली करंजीकर यांचे सकाळी १० ते १२ काल्याच्या किर्तनाची सेवा होणार आहे. श्रीराम कथा प्रवक्ते ह.भ.प. रामायणाचार्य कृष्णा महाराज खोटे यांनी देखिल नियोजन केले आहे. सप्ताह मध्ये रोज सकाळी नाष्टा, दुपारी, संध्याकाळी पंगतीचे आयोजन करण्यात आले आहे.याचा सर्व श्रोत्यांनी आवर्जून लाभ घ्यावा.अशी विनंती ह.भ.प परमेश्वर महाराज खोटे व समस्त ग्रामस्थ मंडळी सोन्नाखोटा यांनी केली आहे.

## दारव्हा, यवतमाळ...

आरक्षण टिकवण्यासाठी सरकारकडून पुढील कायदेशीर पाऊले उचलली जातील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या प्रसंगी कोष्टी समाजातील श्री. श्री. श्री. दयानंद पुरी स्वामीजी, श्री. अरूण वरोडे, राष्ट्रीय अध्यक्ष खऊअ्घक्र श्री. सतीशभाऊ दाभाडे, अध्यक्ष, अखिल महाराष्ट्र कोष्टी परीषद, श्री. सुधीर अलोने, श्री. पंडीतराव इदाते, श्री. विष्णूभाउ कुटे, श्री. रमेश घटे, श्री. सचिन देवांग, श्री. राजीवभाउ निवल, श्री. संजय नवले, श्रीमती संगिता बर्वे (मध्य प्रदेश) , श्रीमती मंजुषाताई लोळे, श्री. नारायणराव वड्डे, डॉ. मंदाताई नांदुरकर, श्री. चंद्रशेखर नवरे, श्री.हर्षल अलोने, प्रा. शिवाजी मोहाळे व एसबीसी आरक्षण न्यायालयीन लढा लढणारे श्री. बालाजी चिनके यांच्यासह समाजातील अनेक मान्यवर व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# सह्याद्री देवराई वनप्रकल्प जगवण्यासाठी वनप्रेमींच्या पुढाकाराने पाण्याचे टँकर

## तर पुन्हा एकदा वनप्रकल्प आगीच्या भक्ष्यस्थानी









### डोकेवाडा तलावातुन कायम स्वरूपी पाणीपुरवठ्याची गरज : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पालवण येथील डोंगरावर २०१७ साली मराठी अभिनेते सयाजी शिंदे आणि सेने पटकथा लेखक अरविंद जगताप यांच्या प्रयत्नातून उभारलेल्या पहिले जागतिक संमेलन जागतिक वृक्ष संमेलन भरलेल्या सह्याद्री देवराई वन प्रकल्पाकडे जिल्हा प्रशासन व वनविभागाच्या दुर्लक्षामुळे घरघर लागली असुन वाळवंट होण्याच्या स्थितीत असुन पाण्याअभावी झाडे वाळली आहेत. याची दखल घेत डॉ . प्रदीप शेळके आणि त्यांचे सहकारी वृक्षप्रेमींनी टँकरद्वारे झाडांसाठी पाणीपुरवठ्याची व्यवस्था करत जागतिक वन दिनाच्या निमित्ताने स वनप्रकल्प वाचवण्यासाठी सहकार्य करावे अशी हाक दिली आहे. दुसरीकडे काल रात्री लागलेल्या आगीत पुन्हा झाडांची हानी झाली आहे. सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील झाडांसाठी पाण्याचा प्रश्न कायम स्वरूपी सुटावा यासाठी पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी डोकेवाडी साठवण तलावातुन पाइपलाइन करून कायमस्वरूपी तोडगा काढावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

पाण्याच्या टँकर साठी यांचे योगदान ; १ तारखेला सयाजी शिंदे पाहणी करण्यासाठी येणार : डॉ.प्रदिप शेळके- सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील झाडांची पाण्याअभावी दुरावस्था झाली असुन झाडे वाळुन करण्याच्या अवस्थेत आहेत. आठवड्यात २५ हजार लिटरचे कमीत कमी ३ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणार असुन आजपासून सुरुवात केली आहे. यासाठी अनिकेत कुलकर्णी, सुप्रिया कुलकर्णी, वैभव जाधव, डॉ.अक्षय भोपळे, आनंद मुंदडा, डॉ.अभिजित थेटे, डॉ. अनुराग पांगरीकर, डॉ.सिताराम आळणे,गोपवाड,जेठाराम प्रजापती, सलीम सय्यद,सुरवसे भाऊ,काळु बेग, अँड.राज पाटील, मनोज पवार,यांनी आर्थिक योगदान दिले आहे. सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील अडचणीच्या अनुषंगाने व्हिडिओ कॉल द्वारे सयाजी शिंदे यांच्याशी बोलणे झाले असून येत्या १ तारखेला वनप्रकल्पाची पाहणी करण्यासाठी ते येणार असुन जिल्हा प्रशासन, वनविभाग व वनप्रेमी, पर्यावरण प्रेमी यांच्या सोबत विचार विनिमय करून कायमस्वरूपी तोडगा काढणार असल्याचे त्यांनी सांगितले. असे डॉ.प्रदीप शेळके यांनी सांगितले.

रात्री लागलेली आग वनरक्षकांमुळे आटोक्यात आली ; वनमजुरांची कमतरता : वनपाल देविदास गाडेकर

काल रात्री साडे ९ च्या सुमारास सह्याद्री देवराई वनप्रकल्पातुन आगीचे लोट उठल्यानंतर लक्षात येताक्षणी वनमजूर जयराम काळे, वनरक्षक शेषेराव राऊत,वनमजुर पदमाकर मस्के यांच्या प्रसंगावधानामुळे आग लवकरच आटोक्यात आणली. २ आर वनक्षेत्रातील झाडे आगीत भस्मसात झाली आहेत. रात्री अपरात्री याठिकाणी येणाऱ्या समाजकंटकांमुळे असे प्रकार घडत असून रात्रपाळीसाठी वनकर्मचारी यांची आवश्यकता असल्याचे वनपाल देविदास गाडेकर यांनी सांगितले.

पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी डोकेवाडा साठवण तलावातुन पाणीपुरवठ्यासाठी निधी उपलब्ध करून कायमस्वरूपी तोडगा काढावा : डॉ.गणेश ढवळे

सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील झाडांसाठी कायमस्वरूपी पाणी पुरवठा व्हावा अशी मागणी तत्कालीन वन विभागीय अधिकारी के.एम.गिते यांनी करत ६७ लाख रुपये निधीची मागणी जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी सहमती दर्शवली होती.परंतु तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड अजित पवार यांनी पालवण गावासाठी येणाऱ्या जलजीवन योजनेंतर्गत कामामधुन पाणीपुरवठा करता येईल त्यासाठी वेगळा निधी खर्च करण्याची आवश्यकता नसल्याचे मत नोंदवले त्यामुळे पुढे ती योजना रखडली. पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील झाडांसाठी डोकेवाडा साठवण तलावातुन पाणीपुरवठा करण्यासाठी स्वतंत्र निधी देण्यात यावा ज्यामुळे कायमस्वरूपी हा प्रश्न मिटेल अशी मागणी केली आहे.

## महावितरणने चालवलेला विजेचा लपंडाव केव्हा थांबणार?

**सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांचा सवाल**

**परळी वै. । प्रतिनिधी**

परळी शहरात गेल्या महिन्याभरापासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असून, यामुळे नागरिक व व्यावसायिक हैराण झाले आहेत. उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना वीजपुरवठ्यातील अनियमिततेमुळे उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मात्र, याकडे महावितरण दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांनी केला आहे. परळी शहरातील नागरिक व व्यावसायिकांना नियमित वीजपुरवठा मिळावा, यासाठी महावितरणने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, वीज गेल्यानंतर दोन-दोन तास परत येत नाही. आली तरी किती वेळ टिकेल, याचा काहीही भरवसा नाही. या अनियमित वीजपुरवठ्यामुळे व्यावसायिकांचे मोठे नुकसान होत आहे. विशेषतः आईस्क्रीम, हॉटेल व इतर विजेवर अवलंबून असलेले व्यवसाय ठप्प होण्याच्या मार्गावर आहेत. तसेच, नागरिकांकडून भरमसाठ वीजबिले आकारली जात असताना, त्यांना २४ तास वीजपुरवठा मिळत नाही, ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. महावितरणचे वीज वितरण वेळापत्रक संपूर्ण कोलमडले असून, वीज केव्हा जाईल आणि केव्हा येईल, याचा काहीही ठावठिकाणा नाही. महावितरणने त्वरित हा विजेचा लपंडाव थांबवावा, अन्यथा मित्र मंडळाच्या वतीने महावितरण कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही अँड. मनोज संकाये यांनी दिला आहे.

**नागरिकांची मागणी – वीजपुरवठा सुरळीत करावा**

**परळीतील नागरिकांनी महावितरणच्या या अनागोंदी कारभाराचा निषेध नोंदवत, विजेचे वेळापत्रक निश्चित करण्याची मागणी केली आहे. अन्यथा, आगामी काळात याविरोधात मोठे आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.**

## पीएम इंटर्नशिप योजनाच्या रोजगाराची संधी

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र शासनामार्फत देशात व राज्यात जास्तीत जास्त तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील या करिता भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (MC) पीएम इंटर्नशिप योजना अंतर्गत १,००,००० पेक्षा अधिक पदाकरिता संधी भारतात वेगवेगळ्या नामांकित कंपन्यांमध्ये आपणास देण्यात येत आहे. भारतातील सर्वोच्च कंपन्यांमध्ये सशुल्क इंटर्नशिपची संधी, तसेच शासनाचा मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करण्यावर भर देण्यात आला आहे. भारतातील केंद्र शासनाच्या करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांपैकी एक असलेल्या पीएम इंटर्नशिप योजना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येत आहे.

पीएम इंटर्नशिप योजनासाठी नोंदणी सुरू झाली आहे. या योजनेचा लाभ व अर्जाची माहिती खालीलप्रमाणे. पात्रता- वय २१-२४ वर्षे, पूर्णवेळ शिक्षण आणि नोकरीत नाही. प्राधान्य पात्रता- इयत्ता १०, इयत्ता १२, खढख डिप्लोमा, पदवीधर

पात्रता नसणारे- उच्चशिक्षण संस्थांमधून पदवी प्राप्त केलेले (IT, IIM, NLU, IISER, NID, IIIT), C, CM, CS, MBBS, BDS, MB, किंवा कोणतीही पदव्युत्तर/उच्च पदवी यांसारखी पात्रता, छझड किंवा छढड अंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केले, आधीच सरकारी कौशल्य, प्रशिक्षणार्थी, इंटर्नशिप किंवा प्रशिक्षण कार्यक्रमात, कुटुंबातील कोणताही सदस्य रू. ८ लाख (आर्थिक वर्ष २०२३-२४) पेक्षा जास्त कमावतो,

## शासकीय धान्य गोदामातील फेब्रुवारी महिन्यापासून संपावर असलेल्या हमाल व त्यांच्या संघटनेशी चर्चा करून पुरवठा विभागाने तोडगा काढावा: विशाल इंगोले

**बीड । प्रतिनिधी**

मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना असल्याने शासकीय धान्य गोदामातील हमाल संपावर असल्याने मार्च महिना संपत आला तरी पण पुरवठा विभाग व हमाल संघटना यांच्यात तोडगा निघाला नाही तरी जिल्हा पुरवठा अधिकारी ओमकार देशमुख साहेब यांनी यावर चर्चा करून तात्काळ मार्ग काढावा कारण शहरी भागासह ग्रामीण भागात पण मुस्लिम समाज असल्याने पवित्र असा रमजान महिना आहे व फेब्रुवारी महिन्यात ज्वारी असल्याने अनेक दुकानदार यांना उशिरा धान्य मिळाले व मशिन सर्व्हर डाऊन असल्याने व केंद्र सरकारने धान्य वाटप करण्यासाठी मुदतवाढ न दिल्याने ग्रामीण भागातील अनेक कार्ड धारक फेब्रुवारी महिन्यात धान्यावाचुन वंचित राहिले हिच परिस्थिती या महिन्यात ऊदभवली आहे आज मार्च महिना संपत आला तरी पण हमाल संघटनेने संप मागे घेतला नाही परिणामी केंद्र सरकार धान्य वाटप करण्यासाठी मुदतवाढ देतील किंवा नाही हे माहिती नाही तरी पुरवठा विभागाने तातडीने पाऊल उचलत योग्य तो निर्णय घ्यावा जर शासकीय हमाल संघटना संप मागे घेत नसतील तर पुरवठा विभागाने ईतर हमाल तात्पुरते पर्यायी व्यवस्था म्हणून उपलब्ध करून तात्काळ धान्य वाहतूक सुरू करावी असे शिवक्रांती सेना संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष तथा स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे बीड तालुका अध्यक्ष विशाल इंगोले यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.




### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री. आर. आर. जाधव ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई, गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज क. २६७/२०२५**

**सत्यभामा व ईतर ३ वि. निरंक, (मार्फत- अँड. ए. ए. आरबड, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नारायणराव पि.हरिहर शिंदे, रा. मौजे माटेगांव, ता. गेवराई, जि. बीड हे दिनांक २१/०१/२०२५ रोजी मौजे माटेगांव, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले.

अर्जदार :- १) सत्यभामा भ्र. नारायण शिंदे, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. माटेगाव ता गेवराई, जि बीड, २) उमेश पि. नारायण शिंदे, वय ४० वर्षे, धंदा शेती,रा. माटेगाव ता गेवराई, जि बीड, ३) महेश पि नारायण शिंदे, वय ४५ वर्षे, धंदा शेती. रा. माटेगाव ता गेवराई, जि बीड, ४) रमेश पि. नारायण शिंदे, वय ३८ वर्षे, धंदा शेती,रा. माटेगाव ता गेवराई, जि बीड,

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी फायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरह मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होऊन आपले हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे नारायणराव पि. हरिहर शिंदे, रा. मौजे माटेगांव, ता. गेवराई, जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २०/०३/२०२५ माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ३०/०४/२०२५

**आदेशावरून.**

**(स्वाक्षरीत)** शिक्का **(स्वाक्षरीत)**

**क.लिपीक** **सहा. अधीक्षक**

**दिवाणी न्यायालय, व.स्तर, गेवराई**

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही. सी. जोशी सह दिवाणी न्यायाधीश क स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ४८०/२०२५ (अँड. जी.एम. केकान यांच्या मार्फत)**

**वंचाबाई परमेश्वर खिल्लारे व ईतर वि. निरंक**

ज्यापेक्षा परमेश्वर पि. दौलत खिल्लारे, हे दिनांक २०/०२/२०२४ रोजी रा.पोखरी (घाट) ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार

१ वंचाबाई भ्र. परमेश्वर खिल्लारे, वय ७४ वर्षे, धंदा घरकाम, रा. पोखरी (घाट), ता.जि.बीड, २ लक्ष्मण पि. परमेश्वर खिल्लारे, वय - ३६ वर्षे, धंदा : शेती, रा. सदर. ३ ज्ञानेश्वर पि. परमेश्वर खिल्लारे, वय - ३२ वर्षे, धंदा : शेती, रा. सदर. ४. अर्चना भ्र.पाटीलबुवा मुळीक, वय - ३८ वर्षे, धंदा घरकाम, रा. स्वराज्यनगर, बीड. ता.जि. बीड. ५ शीतल भ्र. बाळु मोरे, वय - ३१ वर्षे, धंदा घरकाम, रा. चाकरवाडी, बीड, ता.जि. बीड.६. जयश्री भ्र . प्रल्हाद आवाड, वय - ३३ वर्षे, धंदा घरकाम , रा. नागझरी ता. पाटोदा जि. बीड.,

अर्जदार क्र १ ही मयत **परमेश्वर पि. दौलत, खिल्लारे,** यांची पत्नी आहे. अर्जदार कं. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच अर्जदार कं. ४ ते ६ या मयतांच्या विवाहीत मुली आहेत. या व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत **परमेश्वर पि. दौलत खिल्लारे,** यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २१/०४/२०२५ आहे.

आज दिनांक १३ मार्च २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**आदेशावरून.**

**(स्वाक्षरीत)** शिक्का **(स्वाक्षरीत)**

**क.लिपीक** **अधीक्षक**

**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती टी. ए. आसरकर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ४८२/२०२५, बाबासाहेब वगैरे विरुध्द निरंक**

अर्जदार : १) बाबासाहेब लक्ष्मण मोरे, वय ४६ वर्ष, धंदा शेती, रा. घोडका राजूरी, ता. जि. बीड, (२) अरुणा बाबासाहेब मोरे. वय ३५ वर्ष, धंदा घरकाम, रा. सदर

विरुध्द

**मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत सुबोध बाबासाहेब मोरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत सुबोध बाबासाहेब मोरे यांचा मृत्यु दि. १९/०१/२०२५ रोजी राजूरी घोडका, ता. जि. बीड येथे झाला आहे. अर्जदार क्र. १ हे मयताचे वडील असून अर्जदार क्र. २ ही मयताची आई आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत सुबोध बाबासाहेब मोरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक १३माहे मार्च २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २४ एप्रिल २०२५.

**(अँड. डी. एम. रोटे)**

**आदेशावरून.**

**(स्वाक्षरीत)** शिक्का **(स्वाक्षरीत)**

**क.लिपीक** **अधीक्षक**

**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४६१/२०२५ (अँड. रोटे डी. एम.)**

अर्जदार- १) बाबुराव पि. किसनराव काळे, वय-८३ वर्षे, धंदा-शेती, रा. सफेपूर ता. जि. बीड. २) बाळु पि. बाबुराव काळे, वय- ४७ वर्षे, धंदा-शेती, रा. सफेपूर ता. जि. बीड. ३) वैशाली भ्र. उमेश चव्हाण, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. सफेपूर ता. जि. बीड. ४) उर्मिला भ्र. उत्तम सांळुके, वय- ३८ वर्षे, धंदा घरकाम, रा. गणेश चौक, बिसूर, सांगली ता. जि. सांगली.

(५) निर्मला भ्र. अप्पासाहेब गोडसे, वय- ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा. मुधळवाडी, छत्रपती संभाजीनगर ता. जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक अर्जदार हे भारतीय आहेत

**प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे इंद्राबाई भ्र. बाबुराव काळे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे इंद्राबाई भ्र. बाबुराव काळे रा. सफेपूर, ता. जि. बीड या दिनांक १२/०२/२०२५ रोजी सफेपूर, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्रं. १ हे मयताचे पती आहेत. अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा आहे. तसेच अर्जदार क्र. ३ ते ५ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

पुढील दिनांक २१/०४/२०२५, आज दिनांक १९/०३/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**आदेशावरून.**

**(स्वाक्षरीत)** शिक्का **(स्वाक्षरीत)**

**क.लिपीक** **अधीक्षक**

**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक :- ४८१/२०२५, ( मार्फत विधिज्ञ: श्री डी एम रोटे)**

अर्जदार :- १. दादाराव पि.गुंडीबा भोसले, वय ५४ वर्षे, धंदा व्यापार,रा. नागझरी, ता. जि. बीड, ह.मु. रुम नं. १०६४, धम्मदिप नगर, अंबिवली, ठाणे, २.रमेश पि. गुंडीबा भोसले, वय - ५० वर्षे, धंदा शेती व व्यापार, रा. नागझरी, ता. जि. बीड,३. विजया भ्र. संदिपान भोसले, वय - ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. नागझरी, ता. जि. बीड, ह.मु. धम्मदिप नगर, अंबिवली, ठाणे, ४. शरद पि. संदिपान भोसले, वय - २७ वर्षे, धंदा शिक्षण, रा. नागझरी, ता. जि. बीड, ह.मु. रुम नं. १०६४, धम्मदिप नगर, अंबिवली, ठाणे,

विरुध्द निरंक

**प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी नामे गुंडीबा पि. नामु भोसले हे / या दि. ०७/०२/२००२ रोजी नागझरी, ता. जि. बीड येथे मयत असुन अर्जदार क्र १ व २ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क्र ३ ही मयताची सुन आहे. अर्जदार क्र ४ हा मयताचा नातु आहे.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक: १७/०३/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**पुढील तारीख : २८/०४/२०२५.**

**आदेशावरून.**

**(स्वाक्षरीत)** शिक्का **(स्वाक्षरीत)**

**क.लिपीक** **अधीक्षक**

**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
शुक्रवार, दि.२१ मार्च २०२५ पान ४

## अग्नीवीर सैन्य भरतीसाठी ऑनलाईन नोंदणी

**बीड । प्रतिनिधी**

अग्निवीर योजने अंतर्गत वर्ष २०२५–२६ साठी होणाऱ्या अग्नीवीर भर्तीसाठी अविबाहित पुरुष आणि अविवाहित महिला उमेदवारांसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यासाठीची अधिसूचना **www.joinindianarmy.nic.in** या वेबसाईट वर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची तारीख १२ मार्च ते १० एप्रिल राहील. सामान्य प्रवेश परीक्षा संभवता जून महिन्यात प्रसिद्ध करण्यात येईल. हे भर्ती अर्ज अहिल्यानगर, बीड, लातूर, धाराशिव, पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील उमेदवार १२ मार्च ते १० एप्रिल पर्यंत भरू शकतात. तरी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी या संधीचा फायदा घेऊन दि. १० एप्रिल पूर्वी नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.

# धारुर ते तांदळवाडी रस्त्याची चाळणी वाहनचालक हैराण

**विश्वास शिनगारे**

धारुर तालुक्यातील बहुतांश रस्ते आता गुळगुळीत झाले आहेत. यामुळे दळणवळण पूर्वर्वीपेक्षा सुकर झाले आहेधारूर ते तांदळवाडी. या ५ किमी अंतराच्या रस्त्याची अंत्यत दुरावस्था झाली. या रस्त्याची अक्षरशः चाळणी झाली आहे. मोठ-मोठे खड्डे पडलेले असून प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत स्थानिक नागरिकांनी वारंवार दुरुस्तीची मागणी देखील करत आहेत. मात्र याकडे कोणीच लक्ष देत नसल्याने या भागातील नागरिक, वाहनधारकांची मोठी गैरसोय होत आहे.

धारूर ते तांदळवाडीमार्गे पुढे उंदरी व लोखंडी सावरगावला व अंबाजोगाईला जवळचा रस्ता आहे. तसेच धारूरच्या बहुतांश शेतकऱ्यांचा शेतीसाठी हा रस्ता महत्वाचा ठरतो. यामुळे या रस्त्यावरून नेहमीच मोठी वर्दळ असते. मात्र, आता या रस्त्यावर मोठे-मोठे खड्डे पडले असून खड्ड्यातील छोटे-मोठे दगड उघडे पडले आहेत. यामुळे प्रवाश्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तांदळवाडी ते धारूर अगदी ५ किमी अंतराचा रस्ता आहे. मात्र तो पार करण्यासाठी अर्धा तास लागत आहे. शिक्षणासाठी उंदरी, तांदळवाडी येथून मोठ्या प्रमाणात शाळकरी मुले धारूरला येत असतात. मात्र हा रस्ता खराब झाल्याने वाहनांची वर्दळ कमी झाली आहे. परिणामी शाळकरी मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. रस्ता दुरुस्तीबाबत या आधी बांधकाम विभागाला बऱ्याच वेळेल निवेदने देखील स्थानिकांनी दिले. मात्र, याकडे बांधकाम विभाग पुरते दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. तत्काळ हा रस्ता दुरुस्त करावा अशी मागणी नागरिक, वाहनधारक यांच्या वतीने करण्यात येत आहे.



## थोडक्यात

### केज तहसीलकडून जागतिक चिमणी दिवस साजरा

**चिमण्यांना पाण्याची सोय ; झाडांना बांधले प्लास्टिक भांडे**




**केज । प्रतिनिधी**

केज येथील तहसील कार्यालयाकडून जागतिक चिमणी दिवस साजरा करण्यात आला. नायब तहसीलदार अशोक भंडारे यांनी चिमण्यांना पिण्यासाठी पाणी भांडे व्यवस्था करून चिमणी दिवस साजरा केला. उन्हाळ्यात चिमण्यांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही. चिमण्यांचे प्रमाण कमी होत चालले आहे. चिमण्यांना वाचवण्यासाठी तहसील परिसरात असलेल्या झाडांना प्लास्टिकचे भांडे बांधून त्यामध्ये पाणी ठेवण्यात आले. यामुळे झाडावरच्या चिमण्यांना पाणी उपलब्ध झाले आहे हा उपक्रम सर्व नागरिकांनी हाती घेऊन आपापल्या परिसरात चिमण्यांसाठी पाण्याची व्यवस्था करावी. पक्ष्यांना वाचवण्यासाठी कृतिशील उपक्रम राबवावेत असे आवाहन भंडारे यांनी केले.

### दारव्हा, यवतमाळ येथे कोष्टी समाजाचा मेळावा

**एसबीसी आरक्षण टिकविण्यासाठी सरकारकडे निवेदन**



**वडवणी । प्रतिनिधी**

१६ मार्च २०२५ रोजी कोष्टी समाजाच्या नारीशक्ती सन्मान सोहळ्याच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने दारव्हा, यवतमाळ येथे सम ाजातील मान्यवरांनी महाराष्ट्र राज्याचे मंत्री मा. नामदार श्री. संजयजी राठोड यांना विशेष मागास प्रवर्गाचे (डइउ) आरक्षण वाचविण्यासाठी सरकारकडे ठोस प्रयत्न करण्याची मागणी केली. तसेच, मुंबई उच्च न्यायालयात धैींह ह्मै एीिंश्रळीं या संघटनेने डइउ आरक्षणाविरोधात दाखल केलेल्या याचिकेच्या खटल्यात सरकारी पक्षातर्फे निष्णात आणि अनुभवी वकील नेमण्यात यावेत, अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली. या वेळी मंत्री श्री. संजयजी राठोड यांनी डइउ आरक्षण वाचविण्यासाठी सरकार शर्तीचे प्रयत्न करेल, असे आश्वासन दिले. आरक्षण कोणत्याही परिस्थितीत शाबूत राहील आणि त्यास धक्का लागू देणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. महाराष्ट्र सरकारने १९९४ मध्ये डइउ साठी सरकारी नोकरभरतीमध्ये २% आरक्षण देणारी अधिसूचना काढली होती. मात्र, धैींह ह्मै एीिंश्रळीं या संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत या आरक्षणाला आव्हान दिले आहे. याचिकेत दावा करण्यात आला आहे की, हे आरक्षण असंवैधानिक आहे, कारण एकूण आरक्षण मर्यादा ५०% ओलांडते. तसेच, डइउ जात मागास असल्याचे पुरावे नसल्याचे याचिकेत नमूद करण्यात आले आहे. मुंबई उच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी सुरू असून अंतिम निर्णय प्रलंबित आहे. या खटल्यामुळे महाराष्ट्रातील विशेष मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या कायदेशीर स्थितीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. समाजाच्या वतीने मंत्री श्री. संजयजी राठोड यांना दिलेल्या निवेदनामुळे ▶▶ उर्वरित पान २ वर

## जिल्हाधिकारी साहेबांच्या आदेश येताच चौसाळा येथील अतिक्रमण वर हातोडा सुरु झाला २० वर्षातील सर्वात मोठी अतिक्रमण मोहिमेस सुरवात

**चौसाळा । प्रतिनिधी**

चौसाळा ता.जि. बीड येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या परिसरातील नागरिकांनी अतिक्रमण केलेल्या जागेवर शासनाच्या अतिक्रम हटाव मोहिम नुसार अतिक्रमण केलेल्या जागेवर तसेच रस्त्यावरील उभारलेल्या अतिक्रमणावर जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी चौसाळा येथे भेट देऊन महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या उद्घाटन ना प्रसंगी ग्राम पंचायत कार्याच्या आजूबाजूला असलेले व शासकीय जागेतील सर्व अतिक्रमण तात्काळ काढून घेण्याच्या आदेश ग्रामपंचायत कार्यालय चौसाळा, तलाठी कार्यालय चौसाळा, व सार्वजनिक बांधकाम विभाग बीड यांना देताच अतिक्रमण पाडण्यास सुरुवात झालेली आहे मा. तहसीलदार साहेब बीड यांच्या आदेशानुसार गावातील अतिक्रमण काढण्याचे काम सुरू केले आहे दिनांक २० ०३ २०२५ रोजी सदर अतिक्रमण हटाव मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला त्यानुसार ग्रामपंचायत परिसरातील अतिक्रमण असलेल्या जागेवर मशीनच्या सहाय्याने अतिक्रमण हटवण्यात आले



गावातील अनेक ग्रामस्थांनी ग्रामपंचायतच्या शासकीय जागेवर व मालकी नसलेल्या जागेवर रस्त्यावर ही अतिक्रमण केले आहे गावातील बस स्थानक परिसरातील जागेवर नागरिकांनी आपापले दुकाने थाटले आहेत सदर अतिक्रमण च्या जागेवर अनेकांनी अधिकृतपणे बांधकामे केले आहेत तरी सदरील अतिक्रमण धारकांनी आपले अतिक्रमण तातडीने एक दिवसात हलवावे अन्यथा सदर बांधकाम हे जिल्हाधिकारी कार्यालय बीड ग्राम पंचायत चौसाळा महसूल विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या संयुक्त नुसार हटविण्यात येईल ▶▶ उर्वरित पान २ वर

## आज सोन्नाखोटा येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील मौजे सोन्नाखोटा येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आणि श्रीराम कथा ज्ञानयज्ञ महोत्सवाचे आयोजन संयोजक ह.भ.प.श्री. परमेश्वर महाराज खोटे यांच्या अमृतमयवाणीतून दि. २१ मार्च ते २८ मार्च २०२५ यादरम्यान रात्री ९ ते ११ या वेळेत अखंड हरिनाम सप्ताह ऐकण्याचे भाग्य श्रोत्यांना लाभणार आहे. हरिपाठ भावचिंतन या भव्य दिव्य सोहळ्याचे आयोजन विठ्ठल रूक्मिण मंदिर सोन्नाखोटा ता. वडवणी जि. बीड येथे ग्रााम स्थांच्या वतीने ह.भ.प. नवनाथ महाराज गोरक्षनाथ टेकडी यांच्या आशिर्वादाने व गावकरयांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून याची गावकऱ्यांच्या वतीने जय्यत तयारी करण्यात येत आहे. तर या महोत्सवात रात्री ९ ते ११ या वेळेत दररोज महाराष्ट्रातील नामांकित किर्तनकरांची किर्तन ऐकाण्याचे भाग्य श्रोत्यांना लाभणार आहे. शुक्रवार दि. २१ मार्च २०२५ ह.भ.प. सुरेश महाराज लांडे, शनिवार दि. २२ मार्च २०२५ ह.भ.प सुनील महाराज सहाणे, रविवार दि. २३ मार्च २०२५ ह.भ.प अजय महाराज खैरनार, सोमवार दि. २४ मार्च २०२५ ह.भ.प दीपक महाराज मेटे, मंगळवार दि. २५ मार्च २०२५ ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड मतदारसंघातील प्रश्न आ. क्षीरसागरांनी सभागृहात गाजवले




**मुंबई । प्रतिनिधी**

बीड मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडून आ.संदीप क्षीरसागरांनी गुरूवारी (दि.२०) रोजी सभागृहाचे लक्ष वेधले. मतदारसंघात विकासकामांना मिळालेला निधी कोविड काळात वळविल्याने रखडलेली कामे, ग्रामीण भागातील शाळांची दुरूस्ती करणे तसेच विविध सोयी-सुविधा उपलब्ध करणे, रस्ते दुरुस्ती, पुल दुरूस्ती करणे आदी मुद्दे आ.क्षीरसागरांनी अधिवेशनात गाजवले. बीड मतदारसंघात असलेले श्री क्षेत्र कपीलधार देवस्थान हे संपूर्ण महाराष्ट्रातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरून देखील भाविक याठिकाणी येत असतात. कोवीड काळाअगोदर श्री क्षेत्र कपीलधार देवस्थानच्या विकासासाठी १०० कोटी रूपयांचा विकास आराखडा मंजूर झाला होता. परंतु कोवीडच्या महामारी काळापासून याबाबतची कार्यवाही ठप्प झाली. त्यामुळे म हाराष्ट्रभरातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री क्षेत्र कपीलधारचा विकास करण्यासाठी शासनाने निधीची तरतूद करावी. यासोबतच बीड मतदारसंघात एकूण ३५० शाळा आहेत, त्या शाळांमधील ५९२ शाळा खोलींची अतिशय दुरावस्था झाली आहे म्हणजे त्या अक्षरशः पडतीला आल्या आहेत. ६३ वस्तीशाळांच्या इमारतींसाठी निधीची गरज आहे. तसेच ग्रामीण भागातील अनेक रस्ते आणि पूल दुरूस्तीला आले आहेत त्यांना मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा ३ मधून मंजूरी देण्यात याव्यात. अनेक ग्रामपंचायत कार्यालयाच्या नवीन इमारतींची मागणी सातत्याने होत आहे. त्यासाठी निधी देण्यात यावा. या महत्त्वाच्या बाबींवर प्रकाश टाकून आ.संदीप क्षीरसागर यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

### विमानतळ होतय ही आनंदाची बाब पण....

**बीडमध्ये विमानतळ होणार. या कामासाठी निधीची तरतूद करून याबाबतच्या कार्यवाहीला लवकरच सुरूवात करण्यात येईल अशी घोषणा याच आठवड्यात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार साहेबांनी याचा मनस्वी आनंद आहे. त्याबद्दल ना.अजितदादांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. परंतु बीड शहरात रहिवास करणार्या ३ लाख लोकांना पाण्यावाचून कधीपर्यंत वेठीस धरायचे! योजना आणि पाणी उपलब्ध असतानाही नागरिकांचे हाल कधीपर्यंत होऊ द्यायचे? ३६ कोटी रूपयांची तातडीने तरतूद करून बीड शहराचा मुलभूत प्रश्न देखील प्राधान्याने मार्गी लावला पाहिजे अशी मागणी आ.संदीप क्षीरसागरांनी बीड शहराच्या जिव्हाळ्याचा असलेल्या पाणी प्रश्नावर केली. त्यासोबतच बीड येथील एमआयडीसीचा विकास करून बीड जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाचा मार्गही सुकर करावा अशी आग्रही मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी सभागृहात केली.**

# माजी विद्यार्थी संघाच्या वतीने बारावी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी नीट व जेईई परीक्षेविषयी विशेष व्याख्यान संपन्न

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये कनिष्ठ म हाविद्यालयातील बारावी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी नीट व जेईई परीक्षेविषयी प्रा. सिद्धेश्वर काळे यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या व्याख्यानातून त्यांनी विद्यार्थ्यांना शासनामार्फत वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेशासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या नीट व जेईई परीक्षेची तयारी कशी करावी. परीक्षेत यशस्वी होण्याची तंत्रे कशी अवगत करावी. नीट व जेईई परीक्षेच्या अभ्यासक्रमासंबंधी सविस्तर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना कोणती पुस्तके अभ्यासासाठी उपयुक्त ठरतील यांची सविस्तर माहिती दिली. या परीक्षांतून यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन व निश्चित ध्येय मनाशी बाळगणे गरजेचे असल्याचे मतही व्यक्त केले. तर अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे विद्यार्थ्यांना नीट व जेईई परीक्षाविषयी माहिती मिळाली.



बारावी नंतर पुढे काय या प्रश्नाचे उत्तरही प्राप्त झाले. निश्चित ध्येय ठरवून विद्यार्थ्यांनी अभ्यास केल्यास आपणास हव्या त्या क्षेत्रात सहज जाता येईल असे सांगितले. प्रारंभी माजी विद्यार्थी संघाचे समन्वयक डॉ. नितीन कुंभार यांनी विशेष व्याख्यानाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष डॉ. कल्याण सावंत यांच्या मार्गदर्शनाने बारावी नंतर पुढे काय यासाठी विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल.बी.जाधवर, कार्यालय अधीक्षक श्री. केशव भोंडवे यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी विद्यार्थी संघाचे समन्वयक डॉ. नितीन कुंभार यांनी केले तर आभार प्रा. राम लोखंडे यांनी मानले.

